जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/संगणक संच व पिन्ट्रर दरपत्रके/ 10707/२०१८ अमरावती शहर दिनांक 16 OCT 2018

**विषय :-** पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील विशेष शाखा,महीला कक्ष आणी वाचक शाखा व कोतवाली,भातकुली व गाडगेनगर करीता ०६ नग संगणक संच व प्रिन्टरसह खरेदी करावयाचे असल्याने त्याबाबतचे दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीनुसार सादर करणे बाबत.

-oooo-

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, या आस्थापनेवरील विशेष शाखा,महीला कक्ष आणी वाचक शाखा व कोतवाली,भातकुली व गाडगेनगर करीता ०६ नग संगणक संच व प्रिन्टरसह खरेदी करावयाचे आहे.त्याकरीता दोन लिफाफा पदध्दतीने दरपत्रके मागणविण्यात येत आहेत.सदरचे दरपत्रके या कार्यालयाचे बेबसाईडवर अपलोड करण्यात येत आहे.तरी अधिकृत पुरवठादार/वितरक/मेसर्स/दुकाणदार यांनी आपले दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयातील प्रंबधक शाखेत पत्र निर्गमीत दिनांकापासुन ०७ दिवसाचे आत (शासकीय सुंटटी वगळुन) सादर करावयाची आहेत.विहित मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकाचाच विचार करण्यात येईल याची कृपया संबधीतानी नोंद घ्यावी.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. **तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.** खालील प्रमाणे कागदपत्रे सादर न केल्यास सदर प्रक्रीयेमध्ये भाग घेता येणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

१. पुरवठादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र
२. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
३. पॅन कार्डची छायांकीत प्रत
४. अधिकृत विक्रेते असल्याबाबत कंपनीचे पत्र

**तांत्रिक लिफाफामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे आढळुन आल्यांनतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल.यांची कृपया नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबत दिनांक व वेळ संबधीताना दरपत्रके उघडण्यापुर्वी सुचित करण्यात येईल.**

**(एम.एच. बैस)**
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

**प्रति,**

१) ------------------------------------------------

२) ------------------------------------------------

३) ------------------------------------------------

**प्रत,** सपोनि , सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत कृपया प्रबंधक शाखेत परत करावी.



Scanned by CamScanner